सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३९ | सोमवार, दि. ३ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

३ नोव्हेंबर

- टाइम्स ऑफ इंडिया हे वृत्तपत्र मुंबईत प्रथम द बॉम्बे टाइम्स आणि जनरल ऑफ कॉमर्स म्हणून प्रकाशित झाले.
- भारतीय संगीत संवर्धन मंडळातर्फे पुण्यात अखिल भारतीय संगीत परिषद आयोजित करण्यात आली.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

अवकाळी पावसाने शेतकरी झाले उद्ध्वस्त

ग्लॅमरचे जग सोडून 'तो' मारतोय झाडू... आश्रमातील तो तरुण कोण ?

सोने, चांदी आणखी स्वस्त होणार?

...पान ३ वर



## मराठी वाङ्मय मंडळ निवडणूक

# 'अभिजात'चे ११ जागा मिळवून वर्चस्व सिद्ध

## 'परिवर्तन'ला केवळ ७ जागांवर मानावे लागले समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील मराठी वाङमय मंडळाच्या एकूण १८ जागांसाठी अत्यंत चुरशीच्या लढती झाल्या. यात अभिजात मराठी पॅनलने बाजी मारली. ११ जागांवर विजय मिळवून त्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. परिवर्तन पॅनलला सात जागांवर समाधान मानावे लागले. अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अविनाश जोशी ९० मते मिळवून विजयी झाले. तर त्यांचे प्रतिस्पर्धी शरद सोनवणे यांना ६० मते मिळाली. अभिजात मराठी पॅनलचे नेतृत्व डॉ. जोशी, तर परिवर्तन पॅनलचे नेतृत्व शरद सोनवणे यांनी केले. मराठी वाङमय मंडळासाठी रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी नांदेडकर सभागृहात सकाळी ९ ते दुपारी १ या वेळात मतदान प्रक्रिया पार पडली.

एकूण २०६ पैकी १५२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजेच ७३. ७८ टक्के मतदान शांततेत झाले. त्यानंतर दुपारी तीन वाजेनंतर मतमोजणीस सुरुवात होऊन निकाल जाहीर करण्यात आला.

निकालानंतर अभिजात पॅनलचे विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. निवडणूक अधिकारी म्हणून भाऊसाहेब देशमुख यांनी कामकाज पाहिले. विजय बोरसे व दिनेश नाईक या सदस्यांनी त्यांना सहकार्य केले.

### प्रा. डॉ. देशपांडे व के. व्ही. कुळकर्णी यांचे ईश्वरचिठ्ठीने उजळले भाग्य

कोशाध्यक्षपदासाठी प्रा. डॉ. उदय देशपांडे व प्रा. डॉ. सुरेश माहेश्वरी यांना समसमान ७६ मते पडली. त्यानंतर ईश्वर चिठ्ठी काढली असता प्रा. डॉ. उदय देशपांडे विजयी घोषीत करण्यात आले. कार्यकारिणी सदस्य पदाच्या ९ जागांसाठी निवडणूक झाली. त्यात के. व्ही. कुळकर्णी व अनिल सोनार यांना समसमान ८३ मते पडली. त्यानंतर ईश्वर चिठ्ठी काढली असता त्यात के. व्ही. कुळकर्णी हे विजयी घोषित करण्यात आले.

**विजयी, पराभूत उमेदवार व कंसात त्यांना मिळालेली मते.**

अध्यक्षपद- डॉ. अविनाश जोशी (विजयी, ९०), शरद सोनवणे (पराभूत, ६०). उपाध्यक्ष- डॉ. रवींद्र कुळकर्णी (विजयी, ७५), विवेकानंद भांडारकर (विजयी, ७४), श्यामकांत भदाणे (पराभूत, ६५), नरेंद्र निकुंभ (पराभूत, ६९), प्रा. शिवाजी पाटील (पराभूत ०९). कार्यवाह- प्रा. श्याम पवार (विजयी, १३२), भय्यासाहेब मगर (विजयी, १०५), प्रदीप साळवी (विजयी, १०३), रमेश पवार (पराभूत, १०१). कार्यकारिणी सदस्य- सौ. वसुंधरा लांडगे (विजयी, १०७), डॉ. महेश पाटील (विजयी, १०३), श्रीमती स्नेहा एकतारे (विजयी, १०३), बन्सीलाल भागवत (विजयी, ९८), प्रा. विजय तुंटे (विजयी, ९७), सौ. कांचन शहा (विजयी, ९३), सोमनाथ ब्रह्मे (विजयी, ८८), संदीप घोरपडे (विजयी, ८८), के. व्ही. कुळकर्णी (विजयी, ८३), अनिल सोनार (पराभूत, ८३), प्रा. सौ. शिला पाटील (पराभूत, ८०), प्रा. डॉ. वसंत देसले (पराभूत, ८०), नरेंद्र पाटील (पराभूत, ७९), नगिनचंद लोढा (पराभूत, ५५), चिंधू वानखेडे (पराभूत, ५०).

## अमळनेर शहरात गुटखा विक्री जोमात; अन्न, औषध प्रशासन विभाग कोमात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य सरकारने गुटखा विक्रीवर पूर्णपणे बंदी घातली आहे. मात्र, तरीही अमळनेर शहरासह तालुक्यात गुटखा विक्री जोमात आहे. गुटख्याचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार सुरू आहे. गुटखा विक्री जोमात आणि अन्न व औषध प्रशासन मात्र कोमात अशीच परिस्थिती सर्वत्र दिसून येत आहे.

गुटखा विक्रीतून लाखो रुपये व्यापारी कमवतात. त्यांना कुठल्याही कायद्याचा धाक नाही. प्रशासनाचे अस्तित्वच नसल्याचे दिसून येते. गुटखा विक्रीवर कडक कारवाईच्या घोषणा कागदावरच मर्यादित राहिल्या आहेत. प्रत्यक्षात, रात्री- अपरात्री बाहेरून येणाऱ्या गाड्या शहराच्या हद्दीत गुपचूपपणे पोहोचोवतात. या गाड्यांमधील माल थेट चौकात,




गल्लीबोळात आणि पानटपऱ्यांवर पोहोचतो. गुटख्याच्या पुड्यांच्या माळा अक्षरशः वाऱ्यासारख्या फिरतात. प्रशासन मात्र डोळ्यावर पट्टी बांधून गप्प बसल्याचे दिसून येते. स्थानिक विक्रेते दुचाकी व चारचाकीतून गुटख्याचे पोते एका ठिकाणी साठवून ठेवतात. मागणीप्रमाणे गावोगावी, खेड्या-पाड्यातील पानटपऱ्यांवर हा गुटखा मोटरसायकलीने पुरवला जातो. शहरात फेरफटका मारला, तर रस्त्याच्या कडेला, शाळांच्या परिसरात, सार्वजनिक ठिकाणी गुटख्याच्या रिकाम्या पुड्यांचा कचरा आणि लाल पिचकाऱ्यांचे डाग आपले "साक्षीदार" ठरतात. अनेक सार्वजनिक शौचालयांच्या भिंतींवर, इमारतींच्या कडांवर आणि फलकांवर गुटखा खाणाऱ्यांच्या पिचकाऱ्यांनी निर्माण केलेला लालबुंद विद्रूपपणा दिसून येतो. अमळनेर शहराची स्वच्छता आणि सौंदर्य यावरही याचा थेट परिणाम होत आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाने याबाबत अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. नागरिकांच्या तक्रारी असूनही तपास, छापे किंवा दंडात्मक कारवाई दिसून येत नाही. यामुळे विक्रेत्यांना प्रशासनाकडूनच अभय मिळाल्याचे स्पष्ट दिसून येते. गुटख्याचा काळाबाजार करणाऱ्यांना कायद्याची भीतीही दिसत नाही.

## हातभट्टीच्या दारूची कावपिंप्रीत सर्रास विक्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील कावपिंप्री परिसरात बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री जोमात सुरु आहे. त्यामुळे परिसरात नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गावाच्या हद्दीत काही जण गुपचूप गावठी हातभट्टीची दारु बनवतात. त्याची खुलेआम विक्री होत असल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. या गावठी दारु भट्ट्या पोलिसांनी उध्वस्त कराव्यात, अशी मागणी होत आहे.

गावठी हातभट्टीच्या अवैध व्यवसायामुळे तरुण व्यसनाधिन होण्याची भीती व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी काही जण संशयास्पदरित्या फिरत असल्याची ओरड होत आहे. या दारूच्या सेवनामुळे अनेकांचे



संसार उध्वस्त होत आहे. यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीही बळावण्याची भीती व्यक्त होत आहे. याबाबत पोलिसांकडून ठोस कारवाई होत नाही. यामुळे दारू विक्रेत्यांचा मनोबल वाढले आहे. पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळ आणि सामाजिक संघटनांनी जनजागृती करण्याचीही गरज निर्माण झाली आहे.

## नोव्हेंबरही यंदा पावसाचा...!

### राज्यात किमान तापमान अधिक राहण्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नोव्हेंबर महिन्यात राज्यात किमान तापमान सरासरीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. परिणामी, राज्यात नोव्हेंबर महिन्यात थंडी कमी असेल. याचबरोबर देशातील अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, नोव्हेंबर महिन्यात राज्याबरोबरच संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

नोव्हेंबर महिन्यातील कमाल, किमान तापमान आणि पाऊस याचा अंदाज वर्तविण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी नोव्हेंबरचा अंदाज सादर केला. यावेळी नोव्हेंबर महिन्यात वायव्य भारताचा काही भाग वगळता देशाच्या अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचबरोबर नोव्हेंबर महिन्यात देशातील अनेक भागांत सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

या कालावधीत दक्षिण भारतातील राज्यात सर्वाधिक पाऊस पडतो. यंदा या भागात ७७ ते १२३ टक्के पाऊस म्हणजेच सरासरीइतका समजला जातो. दरम्यान, राज्यात किमान तापमान अधिक राहणार असल्याने नोव्हेंबर महिन्यात फारशी थंडी पडणार नाही. याचबरोबर राज्यासह मध्य भारत, वायव्य भारतात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.



### ऑक्टोबरमध्ये ७७. ७ मिमी पावसाची नोंद

ऑक्टोबर महिन्यात राज्यात सर्वदूर पाऊस पडला. राज्यात १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत ७७. ७ मिमी म्हणजेच सरासरीच्या तुलनेत ५ टक्के अधिक पाऊस पडला. कोकणवगळता इतर भागांत सरासरी इतकी नोंद झाली आहे. कोकणात मात्र सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली.

# जळगावात आजपासून शासनाच्या योजनांचे तीन दिवसीय प्रदर्शन

## खासदार स्मितताई वाघांचा पुढाकार; दिल्लीच्या फ्रेंड्ज एक्झीबिशन ॲण्ड प्रमोशनतर्फे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाचे शिखर गाठतो आहे. भारतीयांच्या जीवनात प्रगतीचे नवे दार उघडावे यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या वतीने चालविणाऱ्या योजना व उपक्रमांची जळगाव जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना माहिती व्हावी, यासाठी खास 'प्रगतीशिल महाराष्ट्र २०२५' या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ३ नोव्हेंबर ते बुधवार दि. ५ नोव्हेंबर दरम्यान जळगावच्या शिवतीर्थ -जीएस ग्राऊंडवर हे प्रदर्शन होईल. या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनाला जळगावकरांनी भेट द्यावी, असे आवाहन खासदार स्मितताई वाघ, आमदार राजूमामा भोळे व दिल्लीतील फ्रेंड्ज एक्झिबिशनच्या अखिला श्रीनिवासन यांनी केले आहे. याबात शनिवार दि. १ नोव्हेंबर रोजी हॉटेल सिल्व्हर पॅलेस येथे पत्रकार परिषद झाली.

दिल्ली येथील फ्रेंड्ज एक्झीबिशन ॲण्ड प्रमोशन या संस्थेंने केंद्र सरकारची जनजागरण मोहीम राबविताना या प्रदर्शनाला मूर्त रूप दिले आहे. 'एक उन्नत राष्ट्र की और..' असे घोषवाक्य आहे. हे प्रदर्शन सोमवारपासून तीनही दिवस सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच या कालावधीत सर्व नागरिकांसाठी खुले राहील. सोमवारी, दि. ३




नोव्हेंबर रोजी अकरा वाजता जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीश महाजन यांच्या हस्ते व जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील, केंद्रीय युवा व्यवहार व क्रिडा राज्यमंत्री ना. रक्षाताई खडसे, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे, आमदार राजूमामा भोळे, आमदार मंगेशदादा चव्हाण, अनिलदादा पाटील, किशोर पाटील, अमोल पाटील, चंद्रकांत सोनवणे, चंद्रकांत पाटील व अमोल जावळे आदींच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

खासदार स्मितताई वाघ म्हणाल्या, की या प्रदर्शनात केंद्र - राज्यातील विविध विभागांच्या वतीने चालविणाऱ्या जाणाऱ्या जनकल्याणकारी योजनांबाबत माहिती देणारे स्टॉल्स असतील. यामध्ये कृषी आणि ग्रामीण विकास, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण, जैव सुरक्षा, आयुष, होमियोपॅथी अनुसंधान परिषद, केंद्रीय मत्स पालन विभाग, महाऊर्जा, भारतीय मानक ब्युरो, आयसीएमआर, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नॅशनल फर्लीलायजर लिमिटेड, भारतीय लघु उद्योग विकास बँक, इंडियन फार्मस फर्टिलायजर को आपरेटीव्ह लिमीटेड, गुजरात इफॉर्मेटिक्स लिमीटेड, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, न्यू इंडिया इन्शुरन्स, केंद्रीय गोदाम निगम, भारतीय समुद्री विश्वविद्यालय, केंद्रीय पेट्रोकेमिकल्स, भारतीय चहा बोर्ड, कृषी अधिकार सुरक्षा प्राधिकरण, भारतीय विमान प्राधिकरण, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास मंडळ, कर्नाटक सोप्स एंड डिटर्जेंटस् लिमीटेड, महाराष्ट्र बांबू, ओडीसा बांबू, आधार, जळगाव महापालिका, जळगाव जिल्हा परिषद, जळगाव जिल्हा प्रशासन, कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ-इनक्युबेशन सेंटर अशा विविध खात्यांचे, विभागांचे व संस्थांचेही स्टॉल्स असतील. असे आगळे- वेगळे प्रदर्शन जळगाव शहरात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले आहे. जळगावकरांसाठी ही पर्वणी आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान या त्रयींचा सुरेख संगम असलेल्या या प्रदर्शनाचा जळगावासियांनी लाभ घ्यावा. पत्रकार परिषदेला भाजप जिल्हाध्यक्ष (जळगाव महानगर) दीपक सूर्यवंशी व भाजप जिल्हाध्यक्ष (पश्चिम) डॉ. राधेश्याम चौधरी, फ्रेंड्ज एक्झीबिशनच्या संचालिका तथा प्रोजेक्ट हेड अखिला श्रीनिवासन, संचालक आनंद पाल, दीपकसिंग मेहता, साक्षी सैनी आदी मान्यवर उपस्थित होते.

### जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना प्रदर्शनात संधी

या ऐतिहासिक प्रदर्शनाच्या निमित्ताने जळगाव जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयातील मुलांनाही सहभागी होता यावे म्हणून शोध प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यात जळगाव जिल्ह्यातील आठ शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प प्रदर्शनात असतील. नव्या पिढीच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कल्पक प्रयोगामधील विजेत्यांना स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणारआहे.



# फिनलंडमध्ये स्थायिक होण्याची सुवर्णसंधी : २५ हजारांत पीआर, मोफत आरोग्य शिक्षण आणि आनंदी जीवन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फिनलंड, वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट २०२५ नुसार जगातील सर्वात आनंदी देश, भारतीयांसाठी कायमस्वरूपी निवास (पीआर)ची सोपी आणि स्वस्त प्रक्रिया आणला आहे. अमेरिकेच्या H१B व्हिसा निर्बंधांमुळे पर्याय शोधणाऱ्या भारतीयांसाठी हे एक आकर्षक पर्याय आहे. येथे उत्कृष्ट राहणीमान, निसर्गरम्य वातावरण, मोफत आरोग्यसेवा आणि शिक्षण, तसेच शेंगेन क्षेत्रात मुक्त फिरण्याचा हक्क मिळतो. आयटी, आरोग्यसेवा आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील कुशल भारतीयांना विशेष मागणी आहे. चला, ए टू झेड माहिती जाणून घेऊया.

**फिनलंड : जगातील सर्वात आनंदी देश**

फिनलंड (नॉर्डिक राष्ट्र) वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्टमध्ये सतत आघाडीवर आहे. येथील मजबूत सामाजिक कल्याण व्यवस्था, विश्वासार्ह संस्था, निसर्गसौंदर्य आणि निवांत जीवनशैली पर्यटक आणि व्यावसायिकांना आकर्षित करते. २०२५ च्या इमिग्रेशन अपडेट्समध्ये फिनलंडने गैर-युरोपियन नागरिकांसाठी पीआर प्रक्रिया सोपी केली आहे, ज्यामुळे भारतीयांना अनिश्चित काळ राहण्याचा, काम करण्याचा आणि कुटुंबासह स्थायिक होण्याचा अधिकार मिळतो.

**पीआर ची ऑफर आणि फायदे**

फिनलंड भारतीयांसाठी पीआर (Permanent Residence Permit - P किंवा P-EU) देते. ज्यामुळे -
**अनिश्चित काळ वास्तव्य :** कधीही कालबाह्य होत नाही (दर ५ वर्षांनी रेसिडेंट कार्ड नूतनीकरण आवश्यक).
**कामाचा अधिकार :** पूर्ण स्वातंत्र्य.
कुटुंब एकत्र : पती-पत्नी आणि मुलांना सहज एकत्र आणता येते.
**सेवांचा लाभ :** मोफत आरोग्यसेवा, शिक्षण, सामाजिक सुरक्षा.
**शेंगेन प्रवास :** २७ युरोपियन देशांत व्हिसा-मुक्त फिरणे.
**नागरिकत्वाचा मार्ग :** पीआर नंतर ८ वर्षे राहिल्यास (भाषा प्रवीणता आवश्यक).
पीआर आणि नागरिकत्व वेगळे आहेत. नागरिकत्वासाठी फिनिश/स्वीडिश भाषा (C१ स्तर) आणि ८ वर्षे वास्तव्य आवश्यक. २०२५ अपडेट्स वर्क व्हिसा आणि कुटुंब एकत्रीकरणावर फोकस करतात.

**कोणत्या क्षेत्रातील भारतीयांना मागणी?**

फिनलंडमध्ये कुशल कामगारांची कमतरता असल्याने आयटी, आरोग्यसेवा आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील **भारतीयांना प्राधान्य:**
**आयटी :** सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, एआय, सायबर सिक्युरिटीमासिक पगार ३,०००-५,००० युरो.
आरोग्यसेवा : डॉक्टर्स, नर्सेस, फार्मासिस्टमोफत ट्रेनिंग आणि हाय पे.
**इंजिनिअरिंग :** सिव्हिल, मेकॅनिकल, ग्रीन एनर्जीफिनलंडच्या टेक इंडस्ट्रीसाठी.
२०२५ अपडेट्समध्ये हाय-पे जॉब्ससाठी फास्ट-ट्रॅक प्रक्रिया आहे (मासिक उत्पन्न किमान १,६०० युरो किंवा १.६५ लाख रुपये).

**अटी आणि पात्रता**

**पीआरसाठी मुख्य अटी :**
**वास्तव्य कालावधी :** सतत ४ वर्षे (A-type परमिटवर)२०२६ पासून ६ वर्षे होईल म्हणून २०२५ मध्ये अर्ज करा.
**उत्पन्न :** स्वावलंबी असावे (वार्षिक ४० हजार किंवा ४१ लाख रुपये सुचविले).
**शिक्षण/अनुभव :** पोस्टग्रॅज्युएट डिग्री + २ वर्षे अनुभव किंवा C१ भाषा प्रवीणता + ३ वर्षे नोकरी.
**वय :** कुटुंबासाठी पती-पत्नीचे किमान २१ वर्षे; प्रमुख व्यक्तीने २ वर्षे वास्तव्य.
**क्रिमिनल रेकॉर्ड :** स्वच्छ असावा.
**कुटुंब :** तात्पुरते परमिट धारकांना ३ महिने अतिरिक्त वेळ जॉब शोधण्यासाठी.
तात्पुरते परमिट (B-type) मोजले जात नाही; A-type (काम/शिक्षण/कुटुंब) आवश्यक.

**अर्ज प्रक्रिया: स्टेप बाय स्टेप**

**तात्पुरते परमिट मिळवा :** Enter Finland पोर्टलवर (enterfinland.fi) किंवा भारतातील VFS Global केंद्रांवर अर्ज. कारण- नोकरी, शिक्षण किंवा कुटुंब.
**४ वर्षे राहा :** A-type परमिटवर सतत राहा; नूतनीकरण करा.
**पीआरसाठी अर्ज :** ४ वर्षे पूर्ण झाल्यावर Enter Finland वर ऑनलाइन सबमिट. बायोमेट्रिक्ससाठी फिनिश इमिग्रेशन सेंटरला जा.
**ट्रॅकिंग :** प्रोसेसिंग टाइम चेकरने ऑनलाइन फॉलोअप.
**मंजुरी :** बायोमेट्रिक पीआर कार्ड मिळेल (अनिश्चित काळासाठी).

**कागदपत्रे :**

- पासपोर्ट कॉपी आणि फोटो.
- निवास पुरावा, सॅलरी स्लिप, शैक्षणिक प्रमाणपत्रे.
- फिनलंडबाहेरील सहलींचे रेकॉर्ड.
- कुटुंब माहिती (संबंधित असल्यास).
- क्रिमिनल रेकॉर्ड सर्टिफिकेट.

**खर्च आणि अपील**

**ऑनलाइन अर्ज :** २४० (सुमारे २४, ८०० रुपये)
**पेपर अर्ज :** ३५० ( ३६.३०० रुपये)
**१८ वर्षांखाली :** १८० (१८,६०० रुपये)
**अपील :** नाकारल्यास २६० शुल्क भरून ३० दिवसांत अपील.
बेरोजगारांना जॉब शोधण्यासाठी 3 महिने अतिरिक्त वेळ.





**आव्हाने आणि टिप्स**

**आव्हाने :** थंड हवामान, भाषा अडचण (फिनिश/स्वीडिश), उच्च जीवनखर्च.
**टिप्स :** भाषा कोर्सेस घ्या, जॉब पोर्टल्स (TE-palvelut.fi) वापरा, VFS Global मार्गे सुरू करा. २०२५ मध्ये अर्ज करा. कारण २०२६ पासून कालावधी वाढेल.
फिनलंड पीआर भारतीयांसाठी आनंदी आणि सुरक्षित जीवनाची संधी आहे. अधिक माहितीसाठी enterfinland.fi वर भेट द्या. जर तुम्ही कुशल व्यावसायिक असाल, तर हे पर्याय ताबडतोब अवलंबा.

---

**सक्सेस स्टोरी**

# महिन्याला चक्क तीन लाखांची कमाई
## कोट्यवधींची संपत्ती; स्वत: सांगितला यशाचा मार्ग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कर्नाटकातील बेंगळुरूमधील एका ऑटोरिक्षा चालकाची प्रेरणादायी कहाणी सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे.
हा रिक्षाचालक दोन आलिशान बंगल्यांचा मालक आहे. ज्यांची प्रत्येकी किंमत ४-५ कोटी रुपये आहे. या बंगल्यांमधून भाड्याच्या स्वरूपात त्याला दरमहा २-३ लाख रुपये मिळतात. याशिवाय तो एका एआय-आधारित स्टार्टअपमध्ये गुंतवणूकदार किंवा संस्थापक म्हणून कार्यरत आहे. ज्यामुळे त्याची संपत्ती आणखी वाढली आहे.

**कमाईचा मार्ग**

एका प्रवाशाशी बोलताना या रिक्षाचालकाने सांगितले, की तो रिक्षा फक्त आठवड्याच्या शेवटी चालवतो. कारण ही त्याची ' पहिली नोकरी ' आहे. त्याची मुख्य कमाई भाड्याच्या मालमत्तांमधून येते. बेंगळुरूमधील मालमत्तांच्या वाढत्या किमतीमुळे काही वर्षांपूर्वी कमी किमतीत घेतलेल्या जमिनी आणि बंगल्यांनी त्याला लाखोंची कमाई मिळवून दिली. याशिवाय एआय स्टार्टअपमधील गुंतवणुकीने त्याला बेंगळुरूच्या टेक हबच्या संधींचा फायदा घेता आला.

**सोशल मीडियावर चर्चा**

या रिक्षाचालकाच्या कहाणीने नेटकऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. काहींनी ही गोष्ट अशक्य वाटल्याचे सांगितले, तर काहींनी बेंगळुरूमधील जुन्या रहिवाशांनी कमी किमतीत जमीन खरेदी करून कोट्यवधी कमावल्याच्या कहाण्या शेअर केल्या. काही ज्येष्ठ नागरिक एकटेपणा दूर करण्यासाठी किंवा छंद म्हणून रिक्षा चालवितात, असेही सांगितले गेले. ही कहाणी खरी असो वा नसो, निश्चितच प्रेरणादायी आहे.

**यशाचे रहस्य**

या रिक्षाचालकाचे यश स्मार्ट गुंतवणूक आणि विविध उत्पन्नांच्या स्रोतांवर अवलंबून आहे. बेंगळुरूसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात मालमत्ता आणि स्टार्टअप्समधील गुंतवणुकीने सामान्य व्यक्तीही श्रीमंत होऊ शकते, हे त्याने दाखवून दिले. त्याचा हा प्रवास मेहनत, दूरदृष्टी आणि योग्य वेळी घेतलेल्या निर्णयांचे उत्तम उदाहरण आहे. इतरांसाठी ही कहाणी प्रेरणा आहे, की कठोर परिश्रम आणि बुद्धिमान गुंतवणुकीने आर्थिक यश मिळविता येते.

---

## वीरेंद्र सेहवाग आणि पत्नी आरती अहलावत :
# २० वर्षांच्या लग्नानंतर वेगळे होण्याच्या चर्चा; ' ग्रे डिवोर्स ' म्हणजे नेमके काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



माजी भारतीय क्रिकेटर वीरेंद्र सेहवाग गेल्या काही दिवसांपासून त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. २० वर्षांच्या लग्नानंतर तो आणि पत्नी आरती अहलावत वेगळे राहत असल्याच्या अफवा सोशल मीडियावर आणि बातम्यांमध्ये जोर धरू लागल्या आहेत. दोघांनी इन्स्टाग्रामवर एकमेकांना अनफॉलो केल्याने आणि दीर्घकाळ एकत्र न दिसल्याने ' ग्रे डिवोर्स 'च्या चर्चा सुरू झाल्या आहेत. मात्र दोघांनी याबाबत अधिकृत विधान दिलेले नाही.

**' ग्रे डिवोर्स ' म्हणजे नेमके काय?**

' ग्रे डिवोर्स ' म्हणजे ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या जोडप्यांमधील घटस्फोट किंवा वेगळे होणे. हा शब्द आयुष्याच्या मध्यानंतर (म्हणजे दीर्घकाळ एकत्र राहिल्यानंतर) उद्भवणाऱ्या वैवाहिक नात्यातील तुटण्यासाठी वापरला जातो. अनेकदा हे जोडपे कायदेशीर घटस्फोट घेत नाहीत, तर फक्त वेगळे राहण्याचा पर्याय निवडतात काहीवेळा एकाच घरात किंवा मुलांसोबत. याला ' सिल्व्हर स्प्लिटिंग ' असेही म्हणतात. हे प्रकरण वाढत्या वयात नात्यातील बदल, स्वातंत्र्याची इच्छा किंवा इतर कारणांमुळे उद्भवतात. भारतीय सेलिब्रिटींमध्येही ' ग्रे डिवोर्स 'चे अनेक उदाहरणे आहेत. सुपरस्टार कमल हसन आणि सारिका हसन (१७ वर्षांनंतर २०२४ मध्ये), अरबाज खान आणि मलाइका अरोरा (१९ वर्षांनंतर २०१७ मध्ये), आमिर खान आणि किरण राव (१५ वर्षांनंतर २०२१ मध्ये), कबीर बेदी आणि प्रिया (२०१६ मध्ये) आणि आशिष विद्यार्थी आणि सुप्रिया (२०१७ मध्ये) यांसारख्या जोडप्यांनी असा निर्णय घेतला आहे.

**सेहवाग-आरतीचा २० वर्षांचा वैवाहिक प्रवास**

क्रिकेट मैदानावरील फटकेबाजीमुळे जगप्रसिद्ध असलेल्या वीरेंद्र सेहवागचा जन्म २० ऑक्टोबर १९७८ रोजी झाला. त्यांचा विवाह २४ एप्रिल २००४ रोजी आरती अहलावतशी झाला, जो तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या घरी साजरा झाला. लग्नानंतर दोघांना दोन मुलं झाली: आर्यवीर (जन्म: २००७) आणि वेदांत (जन्म: २०१०). दोन्ही मुले क्रिकेटकडे वळली असून, आर्यवीर डीयूके केजरीवाल क्रिकेट अकॅडमीत सराव करत आहे. २० वर्षे सोबत घालवल्यानंतर सध्या दोघे वेगळे राहत असल्याचे सांगितले जाते, आणि घटस्फोटाची शक्यता नाकारता येत नाही.

**आरती अहलावत कोण आहेत?**

आरती अहलावतचा जन्म १६ डिसेंबर १९८० रोजी नवी दिल्लीत झाला. त्या मूळतः दिल्लीच्या रहिवाशी असून, प्रसिद्ध वकील सुरजसिंग अहलावत यांच्या कन्या आहेत. त्यांनी लेडी इर्विन सेकंडरी स्कूल आणि भारतीय विद्या भवन येथे प्राथमिक शिक्षण घेतले. त्यानंतर दिल्ली विद्यापीठाच्या मैत्रेयी कॉलेजमधून कॉम्प्युटर सायन्समध्ये डिप्लोमा केला. आरती सोशल मीडियावर खूप सक्रिय नसतात आणि त्यांचे इन्स्टाग्राम खाते प्रायव्हेट आहे. त्या एव्हीएस हेल्थकेअर आणि इव्हेंटुरा क्रिएशन्ससारख्या चार कंपन्यांच्या डायरेक्टर आहेत. सेहवागच्या यशामागे त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

वीरेंद्र सेहवाग आणि आरती अहलावत यांच्या वैवाहिक आयुष्यातील या चर्चा त्यांच्या चाहत्यांसाठी धक्कादायक आहेत. मात्र, हे प्रकरण अद्याप अधिकृत नाही. 'ग्रे डिवोर्स' सारख्या घटना वाढत्या वयात नातेसंबंधांच्या बदलांचे प्रतिबिंब आहेत. सेहवाग कुटुंबाने याबाबत स्पष्टता आणल्यासच सत्य समोर येईल.

---

# लक्ज़मबर्ग : एक ऐसा देश, जहां गरीब ढूंढना भी है नामुमकिन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुनिया के तमाम देशों में गरीबी एक बड़ी चुनौती मानी जाती है, लेकिन लक्ज़मबर्ग में इन शब्दों का अस्तित्व तक नहीं है। यूरोप के इस छोटे-से देश में प्रति व्यक्ति आय दुनिया में सबसे ज्यादा है। यहां के नागरिक सरकारी स्तर पर बेहतरीन स्वास्थ्य, शिक्षा और सुरक्षा सेवा का लाभ लेते हैं। महंगी कारों, आलीशान घरों, और खुशहाल जिंदगी का सपना यहां हकीकत है। आर्थिक और सामाजिक रूप से इतना समृद्ध है कि गरीबी शब्द सिर्फ किताबों में ही देखा जा सकता है। लक्ज़मबर्ग वास्तव में एक ऐसा देश है, जहां हर व्यक्ति जीता है रईसी वाली जिंदगी.
दुनिया में ऐसा भी एक देश है, जहां गरीबी शब्द बस किताबों तक सीमित है और आम इंसान भी आलीशान जिंदगी जीता है ।

**कौन सा है ये देश?**

- यह देश है लक्ज़मबर्ग, जो प्रति व्यक्ति आय (जीडीपी पर कॅपिटा) के हिसाब से दुनिया का सबसे अमीर देश माना जाता है।
- यहां की अर्थव्यवस्था इतनी मजबूत है कि बेरोजगार या गरीब ढूंढना लगभग नामुमकिन है।
- नागरिकों को शिक्षा, स्वास्थ्य, रहन-सहन, हर क्षेत्र में उच्च स्तर की सुविधाएं मिलती हैं।

**कैसे जीते हैं लोग आलीशान जिंदगी?**

- लक्ज़मबर्ग में हर व्यक्ति को सरकारी स्तर पर बेहतरीन सेवाएं, सुरक्षा और सामाजिक मिलता है।
- काम करने का माहौल सकारात्मक है, वेतन उच्च है और टैक्स व्यवस्था नागरिकों के हित में है।
- यहां के ज्यादातर निवासी लग्जरी घरों में रहते हैं, महंगी कारें चलाते हैं और दुनियाभर की सुविधाओं का आनंद लेते हैं।
- शिक्षा और स्वास्थ्य सेवाएं बेजोड़ हैं बच्चा हो या बुजुर्ग, सबको खुशहाल जीवन मिलता है।

**क्यों नहीं मिलता यहां गरीब?**

- देश की जनसंख्या कम है और सरकार सबके लिए आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करती है।
- अंतरराष्ट्रीय निवेश, बैंकिंग, और फाइनेंशियल सर्विसेज ने लक्ज़मबर्ग को वैश्विक तरक्की का मॉडल बना दिया है।
- अमीरी का स्तर ऐसा है कि ज्यादातर लोग करोड़पति हैं ऐसे में गरीबी का नामोनिशान नहीं मिलता।

---

# रात्रीच्या अंधारात चमकणारा महाराष्ट्रातील एकमेव समुद्र किनारा आणि भारतातील इतर चार चमकदार किनारे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निळेशार अथांग समुद्र किनारे पर्यटकांचे मन नेहमीच मोहून टाकतात. जगभरात अनेक वैशिष्ट्यपूर्ण समुद्र किनारे प्रसिद्ध आहेत. भारतातही असे काही खास समुद्र किनारे आहेत जे रात्रीच्या अंधारात ताऱ्यांप्रमाणे चमकतात. भारतात असे पाच समुद्र किनारे आहेत. त्यापैकी एक महाराष्ट्रात आहे. रात्री हे किनारे बायोल्युमिनेसेंट फायटोप्लँक्टनमुळे निळ्या-हिरव्या रोषणाईने उजळतात. ज्यामुळे पर्यटकांना एक अद्भुत अनुभव मिळतो. सूर्यास्तावेळी समुद्र किनाऱ्यांचे सौंदर्य मनाला भुरळ घालते. रात्रीच्या अंधारात चमकणारे हे किनारे पर्यटकांना विशेष आकर्षित करतात. चला, भारतातील अशा पाच चमकदार समुद्र किनाऱ्यांबद्दल जाणून घेऊया.

**महाराष्ट्र -मालवण (देवबाग बीच)**

महाराष्ट्रातील मालवण येथील देवबाग बीच रात्रीच्या अंधारात चमकतो. येथे बायोल्युमिनेसेंट फायटोप्लँक्टनमुळे समुद्राच्या लाटा निळ्या-हिरव्या प्रकाशाने उजळतात. हा नजारा पाहण्यासाठी पर्यटक रात्री येथे भेट देतात.

**गोवा - पालोलेम बीच**

गोवा हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. येथील पालोलेम बीच रात्रीच्या अंधारात चमकणारा एक खास किनारा आहे. या बीचवरील निळ्या-हिरव्या रोषणाईचा नजारा पर्यटकांसाठी अविस्मरणीय आहे. गोव्याला भेट देणाऱ्यांनी या किनाऱ्याला अवश्य भेट द्यावी.

**पश्चिम बंगाल - मंदारमणी बीच**

पश्चिम बंगालच्या पूर्व मिदनापूर जिल्ह्यातील मंदारमणी बीच रात्री ताऱ्यांप्रमाणे चमकतो. येथील बायोल्युमिनेसेंट लाटा पर्यटकांसाठी एक अनोखा अनुभव देतात.

**केरळ - वर्कला बीच**

केरळमधील वर्कला समुद्र किनारा देखील रात्रीच्या अंधारात चमकण्यासाठी प्रसिद्ध आहे. येथील शांत वातावरण आणि चमकणारा समुद्र पर्यटकांना आकर्षित करतो.

**अंदमान आणि निकोबार - राधानगर बीच**

अंदमान आणि निकोबारमधील हॅवलॉक बेटावरील राधानगर बीच रात्री निळ्या-हिरव्या प्रकाशाने उजळतो. हा किनारा जगातील सर्वोत्तम समुद्र किनाऱ्यांपैकी एक मानला जातो आणि त्याचा रात्रीचा चमकणारा नजारा अविस्मरणीय आहे.



**चमकण्यामागील वैज्ञानिक कारण**

या समुद्र किनाऱ्यांच्या रात्रीच्या चमकामागे बायोल्युमिनेसेंट फायटोप्लँक्टन नावाचे सूक्ष्म जीव कारणीभूत आहेत. हे जीव समुद्राच्या पाण्यात असतात आणि लाटांच्या हालचालीमुळे रासायनिक प्रक्रियेद्वारे प्रकाश उत्सर्जित करतात. यामुळे समुद्र रात्री निळ्या-हिरव्या रंगाने चमकतो. ज्याला ' बायोल्युमिनेसन्स ' म्हणतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ग्लॅमरचे जग सोडून 'तो' मारतोय झाडू...आश्रमातील तो तरुण कोण ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वृंदावनमधील प्रेमानंद महाराज यांच्या आश्रमाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ज्यातील एका व्यक्तीला पाहून तुम्हालाही आश्चर्याचा धक्का बसेल. प्रसिद्धी, ग्लॅमरचे जग सोडून एक जण आश्रमात चक्क झाडू मारताना दिसतोय. ही व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नव्हे तर भारताच्या वतीने डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये खेळलेला कुस्तीपटू रिंकू सिंह उर्फ वीर आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओत त्याचा अनोख , वेगळाच अंदाज दिसत आहे. एका दृश्यात तर तो चक्क रस्त्यावर झाडू मारताना दिसतो.

रिंकू सिंग हा एक प्रसिद्ध बेसबॉल खेळाडूही आहे. त्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर चाहत्यांना आश्चर्य वाटले. क्रीडा जगतात आपल्या सामर्थ्यासाठी आणि प्रसिद्धीसाठी ओळखला जाणारा माणूस इतका नम्र असेल असे चाहत्यांना वाटले नव्हते. व्हिडीओच्या कमेंट बॉक्समध्ये अनेकांनी वीर याच्याबद्दल कमेंट्स करत स्तुतीचे पूल बांधलेले आहेत.

**रिंकू सिंगचं ट्रान्सफॉर्मेशन**

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओमध्ये रिंकू सिंगचा अमेजिंग ट्रान्सफॉर्मेशन दाखवण्यात आले आहे. व्हिडिओची सुरुवात माजी डब्ल्यूडब्ल्यूई कुस्तीपटूच्या वेगवेगळ्या हायलाइट्ससह होते. त्यानंतर तो कपाळावर टिळा घेऊन साधूच्या वेषात रस्त्यावर झाडू मारताना दिसू शकतो. व्हिडिओमध्ये तो प्रथम बेसबॉल खेळाडू कसा बनला. नंतर डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये कसा गेला आणि शेवटी अध्यात्माकडे कसा वळला याचा प्रवास त्यात दाखवला आहे. व्हिडिओसह एक कॅप्शन देखील शेअर केले गेले आहे, बेसबॉल, डब्ल्यूडब्ल्यूई ते वृंदावन रिंकू सिंहचे आध्यात्मिक बदल, असे त्यात लिहीण्यात आले आहे.

**रिंकू सिंगच्या प्रवासावर तयार झाला हा चित्रपट**

८७ मैल प्रतितास वेगाने बेसबॉल फेकल्यानंतर रिंकू सिंगच्या व्यावसायिक कारकीर्दीची सुरुवात कशी झाली ? याबद्दलच्या प्रवासावरही या व्हिडिओमध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे. व्यावसायिक बेसबॉल खेळणारा रिंकू सिंग हा पहिला भारतीय ठरला. अमेरिकन मायनर लीगमध्ये अनेक हंगाम घालवले. त्याच्या बेसबॉल प्रवासावर २०१४मध्ये डिस्नेने " मिलियन डॉलर आर्म " नावाचा एक चित्रपटही बनविला होता. हा चित्रपट त्याच्या आणि दिनेश पटेलच्या सत्य कथेवर आधारित आहे, ज्यांना स्पोर्ट्स एजंट जेबी बर्नस्टीनने एका रिॲलिटी शो स्पर्धेत शोधले होते.

डब्ल्यूडब्ल्यूईच्या जगात चर्चेत 'द ग्रेट खली'नंतर रिंकू सिंगने २०१८ मध्ये डब्ल्यूडब्ल्यूईच्या विश्वात प्रवेश केला. रिंगमध्ये रिंकू सिंगला वीर महान म्हणून ओळखले जात होते. त्याने जॉन सीना आणि द ग्रेट खली सारख्या मोठ्या नावांशी स्पर्धा केली. कपाळावर टिळा घातलेला, धोतर-प्रेरित पोशाख परिधान केला आणि रुद्राक्षाचा हार परिधान करून, देसी लूकने त्याला डब्ल्यूडब्ल्यूईच्या मंचावर एक वेगळी ओळख दिली. व्हिडिओचा सर्वात हृदयस्पर्शी भाग म्हणजे प्रेमानंद महाराज यांच्याशी त्याचे संभाषण. आध्यात्मिक गुरु त्यांना सांगतात, "जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही या जगासाठी पात्र आहात, तर या." ज्यावर रिंकू हसतो आणि हात जोडून हळू हळू उत्तर देतो'.

# अवकाळी पावसाने शेतकरी झाले उद्ध्वस्त

## मक्याला फुटले अंकुर, कापसाची बोंडेही गळाली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

अमळनेर : तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. आर्थिक विवंचनांमुळे शेतकरी पार खचले आहेत. मका पावसाने पूर्णपणे खराब झाला आहे .त्यास अंकुर फुटले आहे. कापसाची बोंडेही गळून पडली आहेत.



तालुक्यातील अनेक गावांमध्ये कापूस, मका, कांदा आणि आंतरपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. कपाशी पिकाच्या झाडांवरील बोंडे ओलसर वातावरणामुळे फुटू लागली आहेत. काही ठिकाणी बोंडे इतकी भिजली आहेत की त्यांना अंकुर फुटले आहेत. शेतकऱ्यांनी काढणी करून शेतात साठवलेला मका पावसात पूर्ण भिजला आहे. कणसातील दाण्यांनाच अंकुर फुटले आहेत. त्यामुळे मका विक्रीयोग्यही राहिलेला नाही.

शिरूड रस्त्यावरील शेतकरी भय्या साहेबराव पाटील यांच्या शेतात काढलेल्या मक्याला अति पावसाचे पाणी लागल्याने दाणे उगवले आहेत. अगोदरच अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांवर या नव्या अवकाळी संकटाने आणखी मुळावरच घाव घातला आहे. कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी टाकलेली रोपे पाण्यात सडली आहेत. ती पूर्णपणे निकामी झाली आहेत. त्यामुळे पुढील हंगामातील उत्पन्नावरही मोठा परिणाम होणार आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे ऊन्हा- पावसातील सर्व प्रकारचे श्रम वाया गेले आहेत. एकीकडे खत, बियाणे, मजुरी यावरचा खर्च वाढला आहे . दुसरीकडे पिके हातातून गेल्याने शेतकरी उध्वस्त झाला आहे. सध्या हतबल झालेले शेतकरी सरसकट पंचनामे करुन नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

> मक्याचे कणीस पूर्णपणे खाली गळून पडले आहे. मक्याचा चारा देखील गुरांसाठी कामाला येणार नाही. तसेच कापसाची बोंडे खाली गळून खराब झाली आहेत. शासनाने सरकसट पंचनामे करुन तातडीने नुकसान भरपाई द्यावी.
>
> **– निळकंठ पाटील,**
> शेतकरी, शिरूड.

> अवकाळी पावसामुळे मक्याला मोठा फटका बसला आहे. ९० क्विंटल येणारा मका आता १० क्विंटलही आता येणार नाही. मक्यावर सुमारे ७० ते ८० हजार रुपये खर्च केले आहेत. हा खर्चही निघणार नसल्याने कर्ज कसे फेडावे ही विवंचना आहे. शासनाने लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी.
>
> **– भय्या साहेबराव पाटील,** शिरूड

> सतत होणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांना पीक काढता आले नाही. पीके शेतातच उभी राहिल्याने मोठे नुकसान झाले आहे. कापूस तर गेलाच पण मका आणि सोयाबीन पिकाचेही नुकसान झाले आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी मका काढून मोकळ्या जागी वाळविण्यासाठी ठेवला होता. मात्र, दुर्दैवाने तेव्हाच पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले. अशा पिकांचेही पंचनामे करण्याची आवश्यकता आहे. शासनाने या बाबींचाही विचार करणे गरजेचे आहे.
>
> **– प्रा. सुभाष पाटील,** जिल्हाध्यक्ष, किसान काँग्रेस.

# अमळनेर तालुक्यात नुकसानग्रस्त पिकांच्या पंचनाम्यांना सुरूवात

## १५८ गावांसाठी ३१० पालक अधिकाऱ्यांची नेमणूक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यात २७ ऑक्टोबर २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊस, गारपीटीने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पंचनाम्यांना सुरुवात झाली आहे. तालुक्यांतील १५८ गावांसाठी ग्रामसेवक, तलाठी व कृषीसहायक असे एकूण ३१० पालक अधिकाऱ्यांची तहसीलदारांनी नेमूणक केली आहे.

**असे आहेत अधिकारी...**

| | |
|---|---|
| गावे | : १५८ |
| ग्रामसेवक | : ९७ |
| तलाठी | : ८७ |
| कृषी सहाय्यक | : १२६ |

याबाबत तहसीलदारांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी नेमून दिलेल्या गावामध्ये प्रत्यक्ष शेतात जावे. पिकांची पाहणी करुन पंचनामे करावेत. पंचनामे करताना शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. ६ नोव्हेंबर २०२५पर्यंत पंचनामे पूर्ण करावेत. त्यानंतर अंतीम अहवाल तत्काळ सादर करावा. कामकाजात हलगर्जीपणा आढळल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये कारवाई करण्यात येईल. या पत्रावर तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी व प्रांताधिकारी यांनाही सादर करण्यात आल्या आहेत. दरम्यान, पंचनाम्यांना सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. लवकरात लवकर पंचनामे पूर्ण होऊन आर्थिक मदतही तातडीने मिळावी, अशी अपेक्षाही शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## चौबारी येथे महिलेचा सर्पदंशाने मृत्यू

तालुक्यातील चौबारी येथील जिजाबाई रवींद्र महाले (२७) या महिलेचा सर्पदंशाने मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. ३१ रोजी दुपारी बाराच्या सुमारास घडली. जिजाबाई महाले या दुसऱ्याच्या शेतात रोजंदारीवर कापूस वेचणीचे काम करत असताना त्यांच्या पायाला सर्पाने दंश केला. ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान जिजाबाई यांचा मृत्यू झाला.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# सोने, चांदी आणखी स्वस्त होणार ?

## अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या निर्णयाचे जाणून घ्या संकेत...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या वर्षात सोने- चांदीने उच्चांकी दर गाठल्यावर दिवाळीपासून त्यांच्या दरात मोठी घसरण होत आहे. सर्व जगाचे लक्ष अमेरिकन फेडरलच्या निकालांकडे लागले होते. त्याचा सोने चांदीच्या दरावर परिणाम होतो. आता अमेरिकन फेडरलचे निकाल जाहीर झाल्याने सोने-चांदी आणखी स्वस्त होणार का? याबाबत उत्सुकता आहे. मात्र, सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात अस्थिरता असल्याने सोने-चांदीत तेजी किंवा घसरण काहीही दिसू शकते, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.



यूएस फेडरल रिझर्व्हने मोठा निर्णय घेत व्याज दर कमी केले आहेत. त्यानंतर गुरुवार, दि. ३० आक्टोबर रोजी सोने आणि चांदी एका मर्यादित श्रेणीत होते. मल्टी कमोडिटी एक्सचेंज (एमसीएक्स) वर सोने घसरणीत उघडले. मात्र, दिवसा त्यात किंचित वाढ झाली. शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सोने आणि चांदीच्या किमतीही घसरल्या. मात्र, त्यानंतर त्यात वाढ होताना दिसली. एमसीएक्सवर गुरुवारी सोन्याचा वायदा भाव १, १९, १२५ प्रति १० ग्रॅमवर उघडला, जो मागील बंद १, २०, ६६६ पेक्षा १. २७ टक्के कमी होता. चांदीची सुरुवातही कमकुवत होती. ती ०. ४ टक्के घसरून १, ४५, ४९८ प्रति किलोग्रॅमवर आली. सोने आणि चांदीच्या दरात शुक्रवारी घसरणीने सुरुवात झाली. एमसीएक्सवर ४०० पेक्षा जास्त घसरून १२०, ८८० प्रति १० ग्रॅमवर व्यापार करत आहे. चांदीच्या किमती ८०० पेक्षा जास्त घसरून १४७, ९४२ प्रति किलोग्रॅमवर आल्या आहेत. त्यानंतर त्यात वाढ होताना दिसत आहे.

सुरुवातीच्या सत्रात सोने आणि चांदीने चांगली सुरुवात केली होती. मात्र, यूएस फेडरलने व्याजदर २५ बेसिस पॉइंट्सने ४. ० टक्केपर्यंत कमी केल्यानंतर, आणखी दर कपातीची शक्यता नसल्याने सोन्याच्या किमती कमी झाल्या. तज्ञांचे म्हणणे आहे, की त्यांच्या विधानामुळे नफा वाढू शकतो. अमेरिका-चीन व्यापार चर्चेबाबत आशावादामुळे सोन्याची सुरक्षित-निवास मागणी कमी झाली आहे. अल्पकालीन कमकुवतपणा असूनही, सोने आणि चांदी मजबूत राहतील, असे जाणकारांचे मत आहे. तज्ञांनी सांगितले, की सोन्याला १, २०, ०७०- १, १९, ४८० वर सपोर्ट मिळत आहे, तर १, २१, ४५०-११, २२, १०० वर रेझिटन्स आहे. दुसरीकडे, चांदीला १, ४४, ९५०- ११, ४३, ७५० वर सपोर्ट आहे. १, ४७, २४०- १, ४८, १८० वर रेझिटन्स आहे. ही श्रेणी ओलांडल्यास सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये मोठी घसरण किंवा तीव्र वाढ होऊ शकते. सोन्याच्या किमती चढ- उतार झाले आणि किंचित वाढले, ०. ३८ टक्के वाढून १, २१, १३० प्रति १० ग्रॅम झाले. यूएस फेडरल रिझर्व्हने व्याजदर कपात अपेक्षेप्रमाणे केली असली तरी, सोने आणि चांदीच्या किमती अजूनही कमी झाल्या आहेत. भू-राजकीय तणावामुळे गुंतवणूकदार अजूनही सावध राहू शकतात. त्यांनी पुढे सांगितले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अण्वस्त्र चाचणीला परवानगी देण्याचे संकेत दिल्यानंतर बुलियन मार्केट तेजीला पाठिंबा देत आहे. ज्यामुळे जोखीम धारणा उंचावली. नजीकच्या भविष्यात सोने ११८, ००० ते १२४, ५०० प्रति १० ग्रॅम दरम्यान मर्यादित श्रेणीत राहील. तज्ञांचा असा विश्वास आहे की येत्या दिवसात सोने आणि चांदीच्या किमती अस्थिर राहू शकतात. ज्याचा परिणाम व्यापार चर्चा, व्याजदर आणि भू-राजकीय जोखीम यासारख्या जागतिक संकेतांमुळे होऊ शकतो.




**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.






# एकादशीचा उपवास आणि लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंधरा दिवसांतून एक दिवस संपूर्ण उपवास केल्यास तो शरीराच्या दोषांना जाळून टाकतो. १४ दिवसांत आहाराचा जो रस बनतो त्याचे ओजात रूपांतर होते. म्हणूनच एकादशीच्या उपवासाचा महिमा आहे. एरवी गृहस्थाश्रमींनी मासातील केवळ शुक्लपक्षातील एकादशीचा उपवास करावा, असे आहे. परंतु चातुर्मासात दोन्ही पक्षांतील एकादशीचे व्रत करावे.

**एकादशीचे लाभ**

' पद्मपुराणा 'मध्ये एकादशीचे पुढीलप्रमाणे लाभ सांगितले आहेत.

**स्वर्गमोक्षप्रदा ह्येषा शरीरारोग्यदायिनी। सुकलत्रप्रदा ह्येषा जीवत्पुत्रप्रदायिनी।**

**न गंगा न गया भूप न काशी न च पुष्करम् । न चापि वैष्णवं क्षेत्रं तुल्यं हरिदिनेन च।**
**पद्मपुराण आदिखंड**

अर्थ : एकादशी ही स्वर्ग, मोक्ष, आरोग्य, चांगली भार्या आणि चांगला पुत्र देणारी आहे. गंगा, गया, काशी, पुष्कर, वैष्णव क्षेत्र यांपैकी कोणालाही एकादशीची बरोबरी करता येणार नाही. एकादशीला ' हरिदिन ' म्हणजे विष्णूचा दिवस, असे संबोधतात.

# बेल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हा दक्षिण आशिया व आग्नेय आशिया या भूप्रदेशांत आढळणारा एक वृक्ष आहे. फुलांमुळे, फळांमुळे प्रसिद्ध असलेले बरेच वृक्ष आहेत. केवळ पानांसाठी ओळखले जाणारे थोडेच आहेत. बेल हा वृक्ष त्यापैकी एक आहे. बेल हे वृक्ष त्रिदल हिंदूधर्मीय भारतीयांच्या मनात उमटलेले आहे. भारतवर्षाचे अनार्य संस्कृतीच्या कालापासून जसे शंकराचे नाते आहे तसे बेलाशीही.

बेलाची जन्मभूमी भारत. पण त्याचे शास्त्रीय नाव ' एगिल ' या इजिप्शियन या देवतेवरून ठेवले गेले. हा एगल प्रजातीतील एकमेव जातीचा वृक्ष आहे. बेलाचा वृक्ष १८ मीटर उंचीपर्यंत वाढतो. भारताच्या बहुतेक भागांतील जंगलात बेलाची झाडे नैसर्गिकरित्या वाढतात. भगवान शिव यांच्या पूजेसाठी अत्याव्यश्यक मानली गेल्यामुळे गावोगावी मंदिरांजवळ, उद्यानांमध्ये ती वाढविली जातात. याच्या त्रिदलाशिवाय शिवपूजा पूर्णच होत नाही, असा विश्वास देशभरात आहे.

पानांबरोबरच बेलाची फळेही महत्त्व पावली आहेत. संत्र्याच्या जातीतील या झाडाची फळे अतिशय रुचकर व गुणकारी असतात. बेलफळांचा रंग सोनेरी पिवळट हिरवा असतो. त्याचा चंदनासारखा सुगंध वनातील वातावरण भारावून टाकणारा वाटतो. केवळ बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो असे नाही, तर त्या झाडाची पाने व खोडाचा गाभा याचाही औषधी उपयोग होतो. बेलफळाचा मुरंबा, सरबत हे आवेवरचे रुचकर औषध, भूक वाढणारे टॉनिक या गुणवंत झाडाच्या खोडावर खालपासून वरपर्यंत तीक्ष्ण काटे असतात. बेलाचे फळ पोटाच्या विकारावर फार औषधी आहे.

फळाचा मुरंबा करतात. भावप्रकाश, सुश्रुत साहिता, भैषज्य रत्नावली आदी आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये बेलाच्या उपयोगाबाबत माहिती दिलेली आहे. उष्णताहरक, वात कफ शामक, रेचक, दीपनकारी, हृदयास उपकारक, स्तन्भक, शरीरातील मूत्र व शर्करा कमी करणारा अशी बिल्व फळाची ओळख आहे. बेलात साखर कमी करणारा घटक, टनिक ॲसिड, उडनशील तेल, टनीन तसेच मारशेलीनीस आदी घटक असतात. रातांधळेपणा, डोकेदुखी, डोक्यातील उ नाशक, क्षय, बहिरेपणा, हृदयविकार, पोटाचे दुखणे, अजीर्ण, आम्लपित्त, मंदाग्नी, संग्रहणी, रक्तविकार, मधुमेह, जलोदर, त्वचाविकार, वात ज्वर, कमजोरी, अग्निदग्ध, व्रण गलगंड, तृषाविकार, रक्तातीसार, पित्त अतिसार आदी विकारांमध्ये बेल विशेष गुणकारी आहे. गराच्या फोडी त्यांच्या वजनाच्या चौपटीइतक्या साखरेच्या घट्ट पाकात टाकाव्यात व त्यात जायफळाची पूड, जायपत्री व केशर योग्य प्रमाणात मिसळून ते मिश्रण आठ आठवडे चांगले मुरविल्यास बेलाचा मुरंबा तयार होतो.

भारतीय संस्कृतीत बेल किंवा बिल्ववृक्षाला फार महत्त्व आहे. प्रत्येक शुभकार्याप्रसंगी पूजनात बिल्व पत्रांचा उपयोग केला जातो. वैज्ञानिक दृष्टिकोन लक्षात घेऊनच ही परंपरा सुरू करण्यात आली. बिल्वपत्र शिवलिंगावर वाहताना बोटांच्या आणि तळहाताच्या पृष्ठभागावर, विषाणूंना मारक तत्त्व आणि सुगंध पसरला जातो. वेळोवेळी अंगाला स्पर्श करण्यामुळे शरीरावर आक्रमण करणारे विषाणू मरण पावतात. तसेच बिल्व सुगंधाने पळून जातात. ही पाने भगवान शंकर यांना फार आवडतात. त्यामुळे भगवान शंकर यांच्या पिंडीवर बेलाची पाने वाहण्याचा प्रघात आहे. श्रावणात दर सोमवारी बेलपत्र वाहण्यात येते.

# काय आहे ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे रहस्य ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१९७२ चा काळ अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांचा होता. त्यावेळी त्यांचीदृष्टी पडली. माऊलींच्या समाधीवर, संजीवन समाधी म्हणजे काय हे समजून न घेता त्यांनी डायरेक्ट आळंदी गाठली. त्यावेळी झालेली सविस्तर घटना थोर शास्त्रज्ञ आर. एन. शुक्ल यांनी मांडलेली आहे, ती अशी. वारकरी संप्रदायातील थोर व्यक्ती ह.भ.प. मामासाहेब दांडेकर हे होते. त्यांनी शुक्ल साहेबांना फोन केला. आळंदीची समाधी उखडण्यासाठी काही अंधश्रद्धा निर्मूलनचे लोक येत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे, की जर संत ज्ञानेश्वरांनी जीवंत समाधी घेतली तर ते शरीररूपाने जीवंत असतील किंवा त्यांच्या शरीरातील हाडे तरी सापडतील. मामासाहेबांसमोर खूप मोठा प्रश्न पडला होता यांना रोखायचे कसे ? त्यावेळी शुक्ल साहेब यांनी मामासाहेबांना सांगितले, की माऊली पाहून घेतील. दुसरा दिवस उजाडला. सकाळीच दोन-अडीचशे माणसांचा ट्रक पुण्याहून आळंदीला जाणार आहेत, असे समजल्यावर त्यांच्याअगोदर मामासाहेब दांडेकर व शास्त्रज्ञ शुक्लु साहेब आळंदीला पोहोचले होते.

शुक्ल साहेबांनी सोबत तीन मीटर घेतले होते. त्यातला एक होता गिगरम्युलर काऊंटर. त्यात एक्सरे अल्फा, गॅमा, बीटा नावाचे जे किरण किंवा ऊर्जा असते ते एखाद्या ठिकाणी आहेत की नाहीत हे शोधून काढू शकतो. ते मीटरवर दाखवले जाते. त्याला गिगरम्युलर स्किंटीलेशन काऊंटर असे नाव आहे. तो संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीपासून सहा फूट अंतरावर ठेवला. दुसरा मीटर ज्याला थर्मिस्टरबोलोमीटर म्हणतात. तो घेतला होता. त्याने अल्ट्राव्हायोलेट इन्फारेड आहेत की नाही हे पाहता येते. तोही मीटर समाधीजवळ ठेवला. तिसरा फ्रिक्वेन्सी मीटर रडार हा मीटरही त्या ठिकाणी ठेवला. तोपर्यंत अंधश्रद्धावाली मंडळी डॉक्टर, दोन- तीन इंग्लीश माणसे घोषणा देतच मंदिरापर्यंत पोहोचली. सर्व जमावाला दाराजवळच मामांनी



थांबविले आणि सांगितले, की समाधीबद्दल आम्ही जे सांगतो तो प्रयोग करा. मग तुमचे काम करा. तोपर्यंत शुक्ल साहेबांनी समाधी झाकण्यासाठी तीन वेष्टणे आणली. एक जस्ताचे, एक पितळेचे आणि एक लोखंडाचे. शुक्ल साहेब त्या कार्यकर्त्यांना म्हणाले, की या ठिकाणी तीन मीटर्सही ठेवले आहेत. समाधीवर एकेक झाकण टाकून मीटरवर काय दिसते ते पाहावयाचे आहे. तुम्ही पहाल त्यावेळी आम्ही येथे थांबणार नाही. बाहेर थांबू. त्यांच्यातील दहा-बारा प्रमुख मंडळी पुढे आली. त्यांना गाभाऱ्यात घेतले आणि त्यांना माहिती देऊन मामा व शुक्ल साहेब गाभाऱ्याबाहेर निघून आले. आम्ही सांगितल्याप्रमाणे त्यांनी प्रयोग करून पाहिला. लोखंडी, पितळी, जस्ताचे आवरण काढल्यावर एकच ठराविक रिडींग मीटर दाखवायचे. आत कोणी नसल्याने काटा हलविण्याचा प्रश्नच नाही. त्या लोकांपैकी कोणी मीटरला हात लावत नव्हते. मग काटा रिडींग का दाखवत आहे. रिडींग दाखविणारे चैतन्य स्फुरण स्पंदने कोठून येत आहेत, असा गहन प्रश्न अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांना पडला. यामध्ये कसलाच जादूटोणा हातचलाखी नव्हती हे त्यांच्या लक्षात आले.

शास्त्रीय भाषेत हे प्रयोग त्यांना करून दाखविल्यावर त्यांच्या लक्षात आले संजीवन समाधी म्हणजे काय ? हे जेव्हा त्यांना समजावून सांगितले तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की या ठिकाणी निश्चितपणे चैतन्य आहे. ऊर्जा आहे, स्पंदने आहेत म्हणूनच त्यांचा आलेख मीटर्सवर जाणवतो. चैतन्य दिसत नसले तरी त्याचे अस्तित्व असते. क्ष किरण दिसत नसले तरी त्यांचे अस्तित्व नाकारू शकत नाही. तसेच संत ज्ञानेश्वरांची संजीवन समाधी आहेच. त्यांचे अस्तित्व मनुष्यच काय विज्ञानसुद्धा नाकारू शकत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनाने सर्व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यकर्त्यांचा संभ्रम दूर झाल्यानंतर ही सगळी मंडळी दर सहा महिन्याला समाधीच्या दर्शनाला येऊ लागली. तीन परदेशी नागरिकांपैकी एकाने स्वतःला आळंदीला वाहून घेतले. पुन्हा कधीच कुणी माऊलींवर आक्षेप घेण्याचे धाडस केले नाही. वारकरी सांप्रदायाचे अध्वर्यू ह.भ.प. मामासाहेब दांडेकरांनी आलेल्या सर्व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या सदस्यांना पुन्हा एकदा संजीवन समाधी म्हणजे काय ? हे समजून सांगताना म्हणाले, की एखादा साधू-संत संजीवन समाधी घेतो तेव्हा योगशास्त्राप्रमाणे तो पंचमहाभूतात्मक होतो. शरीर, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांपासून तयार झालेले आहे. जेव्हा तो संजीवन समाधीत उतरतो तेव्हा तो सजग असतो. समाधीत बसल्यावर व्यक्ती निर्विकल्प होते. निर्देही होते. याचा अर्थ त्याच्या शरीरातील पृथ्वी, आप, तेज, वायू हे जे भाग असतात. ते बाहेरच्या ब्रह्मांडातील पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यात एकरूप होऊन जातात. त्यामुळे समाधीच्या जागी काहीही शिल्लक राहत नाही.

# मोरपिसाचे उपयोग



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोरपीस घरात असल्याने अनेक फायदे होतात. मात्र त्याविषयी अनेक जणांना काहीही माहिती नाही. चला तर मग मोरपिसाचे नेमके काय उपयोग आहेत, ते जाणून घेऊया.

**१) कालसर्प :** ज्या व्यक्तीच्या कुंडलीत कालसर्प योग आहे अशा व्यक्तीने ७ मोरपंख घेऊन स्वतःच्या उशीत ठेवावेत. ७ व्या दिवशी ते मोरपंख उशीतून काढून पश्चिम दिशेला भिंतीवर लावावेत. त्यासोबत आणखी ११ मोरपंख वाढवावेत. कालसर्पाचा प्रभाव कमी होईल.

**२) प्रवेशद्वाराचा वास्तुदोष :** प्रवेशद्वाराचा वास्तुदोष असेल तर मोरपंख दाराच्या आतून व बाहेरून लावावेत.

**३) वैवाहिक जीवन :** पती-पत्नीच्या नात्यात दुरावा निर्माण झाला असेल किंवा गोष्ट घटस्फोटापर्यंत जाणारी असेल, तर नाचणाऱ्या मोराचे चित्र घरात लावावे. राधाकृष्णाची मूर्ती घरात असेल तर त्यावरही मोरपंख लावावे किंवा बेडरूममध्ये पश्चिम किंवा पूर्व भिंतीवर एक मोरपिस लावावा.

**४) राहूची महादशा :** ज्यांच्या पत्रिकेत राहूची महादशा असेल त्यांनी आपल्या घराच्या वायव्य कोपऱ्यात मोरपीस लावावे. प्रभाव कमी होण्यास मदत होईल.

**५) हट्टी व तापट मुले :** मुले खोडकर आणि जिद्दी असतील तर मोरपंख माथ्यावर धारण करून द्या अथवा एका हातपंख्यात मोरपीस लावावे व त्याने मुलाला हवा घालावी. तापट व हट्टी मुले शांत होतील.

**६) स्वयंपाकघरातील वास्तुदोष :** स्वयंपाकघरातील नैर्ऋत्य कोपऱ्यात, लाल धाग्यात, सफेद कवडीसोबत २ मोरपीस बांधावेत.

**७) शत्रू मित्र बनण्यासाठी :** पुष्प नक्षत्रावर मंगळवार अथवा शनिवार असल्यास मोरपिसावर अष्टगंधाने शत्रूचे नाव, रात्री लिहून सकाळी ते मोरपीस पाण्यात प्रवाहित करावे.

**८) लहान मुले रात्री घाबरणे :** चांदीच्या ताईतात एक छोटा मोरपीस टाकून मुलाच्या गळ्यात सोमवारी बांधावा. या उपायाने लहान मूल रडत असल्यास त्याचे रडणेही बंद होईल व त्यास नजरही लागणार नाही.

**९) प्रगतीसाठी :** घरातील आग्नेय कोपऱ्यात मोरपीस लावल्यास अचानक येणाऱ्या संकटापासून मुक्ती मिळेल व प्रगती होऊन समृद्धी होईल.

**१०) देवघर :** आपण करत असलेल्या सेवेचे सफलतेने फळ मिळण्यासाठी देवघराला मोरपंखाने सजवावे व कुंकू लावून पूजावे.

**११) सुखमय जीवन :** वृंदावनात घराघरांत सुख-समृद्धी नांदत होती. मोरपीस कोठेही असो त्या ठिकाणी शुभाची निर्मिती होते. कार्यक्षेत्रात तसेच घरात ६ मोरपंख स्थापित केल्यास सुखशांती निर्माण होऊन चिंता दूर होईल. असा हा छोटासा मोरपंख अनेकदृष्ट्या उपयुक्त असून, यामुळे सुख, शांती व समृद्धी वृद्धिंगत करणारा आहे.

# मंदिरात, श्री स्वामी समर्थ केंद्रात हात-पाय धुऊनच का जावे ?

आपण सतत विचार करत असतो तसेच इतरही काही ना काही विचार मनात असतात. या विचार लहरी तरंग रूपाने आपल्याभोवती असतात. इतरांच्या लहरींचाही आपल्या मनावर परिणाम होत असतो. हात-पाय धुतल्याने शरीर व मनाची मलीनता दूर होते. मन ताजेतवाने होऊन चांगल्याप्रकारे सेवा आपण महाराजांच्या चरणी रुजू करू शकतो.

**औदुंबर प्रदक्षिणा कशा कराव्यात ?**

प्रदक्षिणा घालताना प्रथम श्री स्वामी समर्थ महाराजांचा फोटो समोर येईल, अशी पूर्व दिशा साधून मुजरा करावा. त्यानंतर प्रदक्षिणा करायला सुरूवात करावी. प्रत्येक प्रदक्षिणा पूर्ण करून क्षणभर थांबून स्वामींना नमस्कार करून पुढील



प्रदक्षिणा करावी. अन्यथा नुसत्या जलद गतीने ११ प्रदक्षिणा न थांबता घातल्यास ती एकच प्रदक्षिणा होईल. प्रदक्षिणा या शांततेने व संथगतीने मनात श्री स्वामी समर्थ जप करत घाव्यात. हातपाय धुऊन औदुंबराला प्रदक्षिणा घालता व नंतर महाराजांकडे येता. तेव्हा तुम्ही शुद्ध मनाने येता.

**महाराजांना मुजरा करून नाक का घासावे ?**

सद्गुरू प. पू. मोरेदादांचे हितगूज चालू होते. तेव्हा एका स्त्रीने प्रश्न विचारला, की ' समर्थांच्या मंदिरात येताच तीनदा मुजरा करून नाक घासण्याची पद्धत का आहे ?' तेव्हा दादा म्हणाले, की बाई आपण ज्या हिंदू धर्मात आहोत त्या धर्मात देवांचेही ' अ, ब, क, ड ' असे चार प्रकार आहेत. आपले ' श्री स्वामी समर्थ ' महाराज हे ' अ ' वर्गातील देव आहेत. हे ' अ ' वर्गातील देव म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म स्वरूप असून, ते स्वयंजागृत व महापात्र आहेत. अनेक भक्तांना सदैव अजूनही दर्शन देतात. त्यांच्या सर्व भक्तांनी त्यांना कलियुगाचे अधिष्ठाते, राजाधिराज योगीराज असे म्हटले आहे.

**मुजरा किवा नमस्कार दोन्ही शुद्ध आहेत ?**

महाराज राजाधिराज योगीराज आहेत. राजांना हात जोडणे उद्धटपणा ठरणार नाही का ? म्हणून ' महाराजांना ' मुजरा करून नाक घासावे. नाक घासणे म्हणजे परब्रह्माला पूर्णपणे शरण जाणे होय.

**महाराजांना ओवाळताना अर्धचंद्रच का ओवाळावे ?**

पूर्णाकृती ओवाळणे म्हणजे वाटोळे पद्धत होय. अर्धचंद्र स्वरूपात ओवाळण्याने देवाभोवती अग्नीचे कवच तयार होते. म्हणून घरी अथवा केंद्रात स्वामी महाराज अथवा सर्व देवांना अर्धचंद्रकृती ओवाळावे. हे सर्व नियम श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींनी तयार केले आहेत.

